अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपील क्र.७३/२०२३
जा.क्र उआ (सा.प्र.)/ आस्था/ ६७२० दि. १८/०९/२०२३

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका**

अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/७३/२०२३

प्रति,

श्री.सागर मोजर

प्लॉट नं २२, सातारा-४१५००२

यांस

---------------- अपिलार्थी

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

श्री.सागर मोजर, प्लॉट नं.२२, सातारा-४१५००२ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी दि.९/८/२०२३ ऑनलाईन(PUMCO/R/2023/61198) आ.क्र.८३९०, दि.११/०८/२०२३ अन्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज प्राप्त झाला आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/५७१६, दि.२८/०८/२०२३ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| ९/८/२०२३ | ११/८/२०२३ | १०/९/२०२३ | २८/८/२०२३ | ० |

अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती दिशाभूल, अर्धवट व अपूर्ण असल्याने अपिल सुनावणी घेणेकामी ऑनलाईन(PUMCO/A/2023/60172) दि.३१/०८/२०२३ रोजी (आ.क्र.९४९३ दि.५/९/२०२३) रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| ३१/८/२०२३ | ०५/०९/२०२३ | २७/९/२०२३ | होय | -- |

अपिल दिनांक १४/०९/२०२३ रोजी सकाळी ११.३० वा. सुनावणी आयोजित करण्यात आली होती. अपिलार्थी यांना दि.१२/९/२०२३ दूरध्वनीवरुन सुनावणीस उपस्थित राहणेबाबत संपर्क साधला असता सातारा जिल्हा येथे दंगल परिस्थिती असल्याने सुनावणीस उपस्थित राहणे व ऑनलाईन करिता नेटवर्क बंद असल्याने सुनावणीस उपस्थित रहाणे शक्य नसल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थी यांनी दूरध्वनीद्वारे पुढील तारीख मिळणेकामी विनंती केली आहे. त्यानुसार दि.१४/९/२०२३ ची सुनावणी पुढे ढकलण्यात आली असून सुनावणी दि.१८/९/२०२३ रोजी दुपारी ३.०० वा. ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात आली होती. सुनावणीस ऑनलाईन अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी ,आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते.

## विवेचन

अपिलार्थी यांनी "Provided Incomplete, Misleading or False information 'पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील वाहनचालक पदाची समांतर आरक्षणानुसार खुला-खेळाडे पदासाठी एकूण मंजूर पदे, भरलेली पदे आणि रिक्त पदे यांची माहिती अंकामध्ये (संख्यामध्ये) मिळणेबाबत सदर माहिती सोबतच्या ई-मेलद्वारे पीडीएफ स्वरुपात मिळावी" असे अपिल अर्जात नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग पुणे महानगरपालिका यांनी माहिती अधिकारात अर्जास जा.क्र.जमाअ/आस्था/५७१६, दि.२८/८/२०२३ रोजीचे पत्रान्वये दिलेले उत्तर व अपिलार्थी यांचे लेखी म्हणणे पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | मागितलेली माहिती | उपलब्ध माहिती |
|---|---|---|
| १ | पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील वाहनचालक पदाचे खुला-खेळाडू या संवर्गाच्या रिक्त पदाची माहिती मिळणेबाबत. | पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील वाहनचालक पदाचे खुला-खेळाडू या संवर्गाच्या रिक्त पदाची माहिती निरंक आहे. |

माहिती अधिकार अर्जात मागितलेली माहिती अपूर्ण आहे. यात मंजूरपदे, भरलेली पदे यांची माहिती नमूद नाही, तसेच खेळाडू पदाची माहिती निरंक कशी? असा प्रश्न सुनावणी दरम्यान उपस्थित करण्यात आला. सदर माहिती ही फक्त रिक्त पदांची असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले. वाहनचालक या पदाची संपूर्ण माहिती उपलब्ध करुन घेवून १० दिवसात उपलब्ध करुन देणेबाबत अपिल अधिकारी यांनी नमूद केले. सदर विवेचनाअंती पुढील प्रमाणे आदेश पारित करणेत येत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी माहिती उपलब्ध करुन नवीन माहिती दहा दिवसाचे आत अपिलार्थी यांना विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. त्यानुसार, सदर अपिल क्र.७३/२०२३ निकाली काढण्यात येत आहे.

18/9/23

(सचिन इथापे)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत/-

जन माहिती अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका.